आरोग्य सहाय्यक (महिला) गट-क संवर्गातील
कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या व
नेमणूका करणेबाबत.
**(समानीकरण अंतर्गत विनंती बदली)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं.आरोग्य/आस्था-५/२४६/२०२५
अहिल्यानगर दि.१६/०५/२०२५
१८

वाचा - १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलंसधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं. जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था- १४ दि. १५/०५/२०१४.
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्रं.जिपब-४१४/प्र.क्रं.११२/आस्था-१४,दि. ०२/०७/२०१४
३. ग्रामविकास विभागाकडील शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दि.०२/०१/२०१७
४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलंसधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं. जिपब-८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४ दि. ०७/०३/२०१९.
५. मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील पत्र जा.क्र.साप्रवि/आस्था-३/१२२२/३३१/२०२५ दि.२६/०३/२०२५
६. सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दि. १५/०५/२०२५.

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, संदर्भ क्र.२ ते ४ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तदअनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार, तसेच संदर्भ क्र. ५ च्या पत्रान्वये बदल्या करण्यास दिलेल्या परवानगीनुसार जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागाच्या कार्यरत असलेल्या आरोग्य सहाय्यक (महिला) या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावा समोरील रकाना क्र.४ येथुन रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी विनंती बदलीने पदस्थापना देणेत येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव व पदनाम | पदनाम | कार्यरत प्रा.आ.केंद्र तालुका | बदलीने पदस्थापना दिलेले प्रा.आ.केंद्र तालुका | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम मिराबाई बन्सी माळी | आरोग्य सहाय्यक महिला | प्रा.आ.केंद्र वारी, ता.कोपरगाव | प्रा.आ.केंद्र सावळीविहीर, ता.राहाता | समानिकरण विनंती |

वरिल कर्मचा-यांचे बदलीची आदेश खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निर्गमित करण्यात येत आहेत.

१. आदेशात नमुद कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी दि.३१/०५/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे.
२. संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. ७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दिनांक ०१/०६/२०२५ नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास,अनुउपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल. तसेच मुद्दा क्र. ८ मध्ये नमुद केलेनुसार बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३. संबधित कार्यालय प्रमुख यांनी बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यांना त्यांचेकडील कार्यभार सोपविणेबाबत पर्यायी व्यवस्था करुन संबंधितांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कार्यमुक्त करावे.

४. सदर बदली विनंतीने झाली असल्याने संबंधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202505191000162 असा आहे.

(आशिष येरेकर भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

आदेशात नमूद संबधीत आरोग्य सहाय्यक महिला
द्वारा संबधीत कार्यालय प्रमुखांमार्फत

प्रत – तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती -----------

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन दि. ०१/०६/२०२५ नंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र -------------ता.-----------,जिल्हा अहिल्यानगर

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रतः- निवड नस्ती

(आशिष येरेकर भाप्रसे.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर